दिनांक - 14/06/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.01

विषय :- विटा नगरपरिषद पाणीपुरवठा विभागाकडे मनुष्यबळ पुरवठा करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – 1) मा.मुख्याधिकारी यांनी पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांची दिनांक - 12/06/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

नगरपरिषद पाणीपुरवठा विभागाकडील अत्यावश्यक सेवेतील पाणी वितरण करणारे चार कर्मचारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. तसेच एक कर्मचारी कर्तव्य बजावत असताना हृदयविकाराने निधन झाले आहे. तसेच घोगांव जॅकवेल व आळसंद जलशुध्दीकरण केंद्र येथील ही कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यातच पावसाळा सुरू झाला असलने शुध्दीकरण प्रक्रियेत मनुष्य बळाची आवश्यकता आहे. वरील कारणाने पाणी पुरवठा विभागातील कर्मचारी संख्या खुपच कमी झालेली आहे. तसेच उपलब्ध कर्मचा-यांपैकी काही वैद्यकिय प्रदिर्घ रजेवर आहेत. त्यामुळे इतर कर्मचा-यांवर कामाचा प्रचंड ताण आला असून याचा शहराच्या पाणी पुरवठ्यावर गंभीर परिणाम झाला आहे. हे टाळणेसाठी नवीन कर्मचा-यांची आवश्यकता आहे.

तरी नगरपरिषद पाणीपुरवठा विभागाकडे मनुष्यबळ पुरवठा करणेस मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-

( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक - 14/06/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.02

विषय :- विटा नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जाऊन दर तीन वर्षातून एकदा सेप्टिक टँक उपसा करणे कामाबाबत मंजुर निविदाधारक युनिक पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस, मुंबई यांची निविदा रद्द करुन त्यांना काळया यादीत (Black List) टाकणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – 1) मा.मुख्याधिकारी यांनी स्वच्छता निरीक्षक यांची दिनांक - 12/06/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) दि. 12/01/2024 रोजीची फेर ई निविदा.

3) सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र. सीएटी / 2017/प्र.क्र.08/इमा-2 दि.26/11/2018.

4) नगरपरिषदेकडील पत्र जा.क्र.3472 दि.26/02/2024.

5) नगरपरिषदेकडील स्मरणपत्र जा.क्र.3848 दि.14/03/2024.

6) नगरपरिषदेकडील अंतिम स्मरणपत्र जा.क्र.0384 दि.09/05/2024.

विटा नगरपरिषद हद्दीतील घरोघरी जाऊन दर तीन वर्षातून एकदा सेप्टिक टँक उपसा करणे कामासाठी दि.12/01/2024 ते दि.26/01/2024 कालावधीमध्ये फेर ई निविदा मागविणेत आली होती. त्यानुसार युनिक पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस, मुंबई व कॅम फाऊंडेशन, पुणे या दोन निविदाधारकांचीच निविदा दाखल झालेली होती. तदनंतर आर्थिक लिफाफा उघडले असता युनिक पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस, मुंबई यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा 19 % सर्वांत कमी दराची होती.

संदर्भ क्र.3 अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन परिपत्रकानुसार अंदाजपत्रकापेक्षा कमी दराची निविदा असेल तर Additional Performance Security म्हणून अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 14% रक्कम रू.18,90,000/- भरणा करणे आवश्यक आहे. त्यानुसार अनुक्रमे संदर्भ क्र. 4 ने युनिक पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस, मुंबई यांना Additional Performance Security म्हणून अंदाजपत्रकीय रक्कमेच्या 14% रक्कम रू.18,90,000/- डिमांड ड्राफ्ट व्दारे भरून घेणेबाबत कळविले होते. त्यामध्ये संबंधित निविदाधारक यांनी कोणताही प्रतिसाद न दिलेने संदर्भ क्र.5 ने पुन्हा स्मरणपत्राने Additional Performance Security भरणा करणेस कळविले होते. तसेच फोन करूनही याची माहिती देणेत आली. त्यांनतरही संबंधीत निविदाधारक यांनी प्रतिसाद दिला नाही. तदनंतर संदर्भ क्र.6 ने अंतिम स्मरणपत्र देवून दि.13/05/2024 पर्यंत Additional Performance Security भरणा करणेस व सदर Additional Performance

Security भरणा न केलेस संबंधित निविदाधारकाची निविदा रद्द करून त्यांस काळया यादीत (Black List) मध्ये टाकून भरलेली बयाणा रक्कम जप्त करणेत येईल असे कळविले होते. सदरचे अंतिम स्मरणपत्र देवूनही त्यांचा कोणताही प्रतिसाद नगरपरिषदेस मिळाला नाही.

यावरून युनिक पेस्ट कंट्रोल सर्व्हिसेस, मुंबई हे सदर निविदेचे कामकाज करण्यास उत्सुक नसलेचे निदर्शनास येत आहे. तरी त्यांना मंजूर झालेली निविदा रद्द करून त्यांना काळया यादीत (Black List) मध्ये टाकणेत यावे. तसेच सदर निविदेतील L2 निविदाधारक कॅम फांऊडेशन, पुणे यांना ते सदर निविदेचे कामकाज L1 निविदाधारक यांचे मंजूर दराप्रमाणे करणेस तयार आहेत अगर कसे याबाबत त्यांना लेखी पत्राने कळविणेत यावे. जर त्यांनी होकार कळविला तर सदर निविदा त्यांना मंजुर करणेत यावी व त्यांनी नकार कळविलेस फेर-निविदा काढणेत यावी. या सर्व प्रक्रियेस मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-

( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक  - 14/06/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.03

विषय - विटा नगरपरिषदेकडील नवीन अग्निशामक वाहन क्र.एम.एच.10 डी.टी 5761 वाहनाचे कमान पाटे ॲसेंम्ब्ली वाढविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – 1) मा.मुख्याधिकारी यांनी वाहन विभाग प्रमुख यांची दिनांक - 13/06/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेकडील नवीन अग्निशामक वाहन क्र.एम.एच.10 डी.टी 5761 हे वाहन दि.12/04/2024 रोजी खरेदी केलेले असून सदर वाहनाची ग्राऊंड लेवल कमी असलेने व वाहन झोला मारत असलेने वेट बॅलन्स करण्यासाठी कमाट पाटे ॲसेंम्ब्ली मध्ये वाढ करणे आवश्यक आहे. असे केलेस वाहनाचे वेट बॅलन्स झोला मारायचे बंद होईल व वाहनाचे ग्राऊंड लेवल वाढेल. सदरचे काम टाटा मोटर्सचे अधिकृत डिलर यांचेकडून करुन घेणेत यावे. तरी विटा नगरपरिषदेकडील नवीन अग्निशामक वाहन क्र.एम.एच.10 डी.टी 5761 वाहनाचे कमान पाटे ॲसेंम्ब्ली वाढविणेस मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक - 14/06/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.04

विषय - घनकचरा प्रकल्प येथील प्रकल्प हद्दीला लागून असलेल्या शेतकरी यांचे कडून पाणी घेणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – 1) मा.मुख्याधिकारी यांनी स्वच्छता निरीक्षक यांची दिनांक - 13/06/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषदेच्या घनकचरा प्रकल्प केंद्र गट नं 566/3 मध्ये आहे. सदर ठिकाणी खालील तक्त्यात नमूद प्रक्रियेसाठी किमान पाणी आवश्यक असते.

| अ.क्र. | प्रक्रिया | संख्या | आवश्यक पाणी | एकूण आवश्यक पाणी (लिटर) |
|---|---|---|---|---|
| 1 | कंपोस्ट पिट | 18 | प्रति पिट 100 लिटर | 1800 |
| 2 | बायोगॅस | 5 टन | 1500 प्रति टन | 7500 |
| 3 | वृक्ष | 380 | प्रति झाड 2 लिटर प्रति दिन | 760 |
| 4 | बाथरूम | 1 | 200 लिटर | 200 |
| 5 | इतर | - | - | 200 |
| एकूण | | | | 10460 लिटर |

सदर ठिकाणी नगरपालिकेचे पाणी कनेक्शन आहे. परंतु त्यास वरील गरज भागविले जाईल. इतके पाणी उपलब्ध होत नाही.

सदर घनकचरा प्रकल्पाच्या हद्दीला लागून दक्षिणेस श्री. शंकर संपत सुळे यांची शेत जमिन आहे. सदर शेतकरी यांनी त्या शेत जमिनीपर्यंत त्यांचे मालकीचे विहिरीतून पाणी पुरवठा करणेसाठी पाईपलाईन केली आहे.

सदर शेतकरी यांच्याशी करार करून प्रति दिन एक तास पाणी खरेदी केल्यास दररोज पुरेसे प्रमाणात पाणी उपलब्ध होईल, टँकरद्वारे पाणी पुरवून खर्च होणारे इंधन बचत होईल व टँकर वरील अवलंबित्व कमी होईल. तसेच आग लागल्यास वेळीच ती विझवायला सोयीचे ठरेल.

तरी विटा नगरपरिषद घनकचरा प्रकल्प येथे कायम पुरेसा शाश्वत पाणीपुरवठ्याचा स्त्रोत होईपर्यंत श्री.शंकर संपत सुळे शेतकऱ्याशी वाटाघाटी करून पाणी खरेदी करणेस मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक - 14/06/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.05

विषय – विटा नगरपरिषद हद्दीतील सॅनिटरी नॅपकीन, हगीज यांची विल्हेवाट लावणेसाठी इंसिनरेशन मशीन खरेदी करणे, बसवून देणे, कार्यान्वित करुन देणे व इतर अनुषंगिक कामे करणे याकामांना मुदतवाढ मिळणेकामी इलेक्ट्रो ड्रीम्स टेक इंडिया, सांगली यांचे दि.06/05/2024 रोजीचे दाखल अर्जावर निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी भांडार विभागप्रमुख यांची दिनांक - 13/06/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) इलेक्ट्रो ड्रीम्स टेक इंडिया, सांगली यांनी मुदतवाढ मिळणेकामी सादर केलेला अर्ज. आवक क्र.0687 दि.06/05/2024.

प्रशासकीय ठराव क्र.197 दि.12/12/2023 ने विटा नगरपरिषद हद्दीतील सॅनिटरी नॅपकीन, हगीज यांची विल्हेवाट लावणेसाठी इंसिनरेशन मशीन खरेदी करणे, बसवून देणे, कार्यान्वित करुन देणे व इतर अनुषंगिक कामे याबाबतची निविदा इलेक्ट्रो ड्रीम्स टेक इंडिया, सांगली यांना मंजूर करण्यात आली होती. तसेच त्यांना आदेश क्र.3195 दि.08/02/2024 ने कार्यादेश देणेत आला होता. सदरचा कार्यादेश मिळालेपासून तीन महिन्याचे आत काम पुर्ण करणेबाबत कळविणेत आले होते. परंतू, अद्याप सदर काम पुर्ण झालेले नाही.

संदर्भ क्र.2 नुसार इलेक्ट्रो ड्रीम्स टेक इंडिया, सांगली यांनी सदर कामास दोन महिन्याची मुदतवाढ मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे. सदर कामाची मुदत दि.08/05/2024 रोजी संपुष्टात आली आहे. परंतू, लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-2024 साठी आदर्श आचारसंहिता लागू असलेने सदर कामास मुदतवाढ घेता आली नाही.

तरी सदर कामास इलेक्ट्रो ड्रीम्स टेक इंडिया, सांगली यांना दोन महिन्यांची मुदतवाढ देणेस मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक - 14/06/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.06

विषय - विटा नगरपरिषदेच्या बगीचा, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प व इतर आवश्यक ठिकाणी बोअरची व्यवस्था करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – 1) मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक - 13/06/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद हद्दीमध्ये 11 बगीचे असून त्यामधील 6 बगीच्यामध्ये पाण्याची व्यवस्था नसलेने पाणी टँकरने पाण्याचा पुरवठा होत असतो. परंतु पाण्याच्या टँकरने पाणी पुरेसे होत नाही व खर्चही जास्त येतो. तसेच घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प येथे जवळील शेतक-याकडून पाणी विकत घ्यावे लागत आहे. त्यासाठी देखील खर्च जास्त येत आहे. बगीचा ठिकाणी पाण्याची व्यवस्था नसलेने पाण्याअभावी बगिचामधील झाडे वाळत आहेत. त्यासाठी सदरील बगीचा, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प व इतर आवश्यक ठिकाणी बोअरची व्यवस्था करणे आवश्यक आहे. बोअर पाडलेने झाडांना पाणी पुरवठा व्यवस्थीत होवून झाडांची वाढ चांगल्या रीतीने होणार आहे.

तरी विटा नगरपरिषदेच्या बगीचा, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प व इतर आवश्यक ठिकाणी बोअरची व्यवस्था (बोअर पाडणे, मोटर जोडणीसह) करणेस मंजुरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा